महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : ५९ वा | दिनांक : २६/११/२०२४ | वार : मंगळवार

## भाजपला सत्ता स्थापनेपासून रोखता येऊ शकते : सय्यद असीम वकार



**मुंबई** : महाराष्ट्रात आता महायुतीचे सरकार स्थापन होणार असून मुख्यमंत्री कोण होणार यावर चर्चा सुरू आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या पक्षाकडून शिंदेंनाच मुख्यमंत्री पद मिळावे यासाठी आग्रह धरला जात आहे, तर दुसरीकडे देवेंद्र फडणवीस यांच्या नावाची चर्चा सुरू आहे. यावर आता एमआयएमचे वरिष्ठ नेते सय्यद असीम वकार यांनी सत्ता स्थापनेचा फॉर्म्युला सांगितलं आहे.

एमआयएमचे नेते सय्यद असीम वकार यांनी राहुल गांधी, उद्धव ठाकरे आणि शरद पवारांना आवाहन केले आहे. भाजपला सत्तेत येण्यापासून रोखायचं असलेल्यास आम्ही सुचवत असलेल्या फॉर्म्युलावर काम करा. यामध्ये आमचा पक्ष नक्कीच साथ देईल, असेही त्यांनी म्हंटले आहे.

सय्यद असीम वकार म्हणाले, मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंना खुर्ची सोडायची नाही. पण सव्वाशेहून अधिक जागा जिंकल्याने भाजप मुख्यमंत्रिपद सोडण्यास तयार नाही. शिंदेंची महत्त्वाकांक्षा पाहता विरोधकांकडे हीच संधी आहे. महाविकास आघाडी भाजपचाच फॉर्म्युला वापरु शकते. भाजपला त्यांच्याच रणनीतीच्या आधाराने मात द्यायला हवी, असे आवाहन त्यांनी केले आहे.

सय्यद असीम वकार यांनी आकडेवारी मांडत सांगितले, एकनाथ शिंदे यांच्याकडे ५७ आमदार आहेत. तर अजित पवारांकडे ४१ आमदार आहेत. दोघांकडे मिळून ९८ आमदार होतात. महाविकास आघाडीत ५० आमदार आहेत. या सगळ्यांची गोळाबेरीज केल्यास ती १४८ च्या घरात जाते. या संख्याबळाच्या आधारे सत्ता स्थापन करता येऊ शकते.

पुढे बोलताना सय्यद असीम वकार म्हणाले, हा फॉर्म्युला प्रत्यक्षात आणण्यासाठी शरद पवारांना अजित पवारांशी संवाद साधावा लागेल. तसेच राहुल गांधी व उद्धव ठाकरे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना आपल्यासोबत घ्यावे लागेल. असे जर झाले तर भाजपची सगळी समीकरणे बिघडू शकतात. हा फॉर्म्युला जर यशस्वी झाला तर भाजपला सत्ता स्थापनेपासून रोखता येईल, असा दावा वकार यांनी केला आहे.

## सातवी पास सुरेश धसला मंत्री करण्यापेक्षा मला करा : लक्ष्मण हाके



**मुंबई** : विधानसपरिषद नको, माझी लायकी त्याहून मोठी आहे. मला राज्यात गृहमंत्री, अर्थमंत्री किंवा शिक्षणमंत्री करा. त्या सातवी-आठवी पास असलेल्या सुरेश धसला जर तुम्ही मंत्री करणार असाल तर त्यापेक्षा मला करा, असे विधान ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनी केले आहे. तसेच ओबीसींचे प्रश्न सोडवण्यासाठी मला जे माध्यम मिळेल ते घेईन, असे सूचक विधान देखील हाके यांनी केले आहे.

लक्ष्मण हाके म्हणाले, राज्यात ओबीसी असलेल्या अर्ध्या लोकांचे मी नेतृत्व करतो, त्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी मला जे माध्यम मिळेल ते घेईन. सातवी-आठवी पास असलेल्या सुरेश धसला जर तुम्ही मंत्री करणार असाल तर त्यापेक्षा मला करा. माझी लायकी जास्त आहे, ज्ञान जास्त आहे. ओबीसी समाजाचे प्रश्न सोडवण्यासाठी जे काही करावे लागेल ते मी करणार.

पुढे बोलताना लक्ष्मण हाके म्हणाले, ओबीसींनी त्यांचा प्रभाव दाखवला आहे. निवडणुकीच्या निकालाच्या आगोदरच सांगितलं होता की दुप्पट हरियाणा पॅटर्न असेल. माझ्यामुळे अनेक उमेदवार आले आणि अनेकजण पडले. जरांगे, टोपे, शरद पवार हे हवेत होते, त्यांचा करेक्ट कार्यक्रम केला. राजेश टोपे यांची २५ वर्षांची सत्ता ही २५०० मतांनी घालवली. रोहित पवारांचे कान कापून विजय साजरा केला, असे लक्ष्मण हाके म्हणाले.

## अजित पवारांना मुख्यमंत्री करावे : नरहरी झिरवळ

**मुंबई** : महाराष्ट्रात विधानसभा निवडणुका पार पडल्या व महायुती पुन्हा एकदा सत्ता स्थापन करणार यावर शिक्कामोर्तब झाला. महायुती विरुद्ध महाविकास आघाडी अशी प्रमुख लढत राज्यात पाहायला मिळाली. महायुतीचा प्रचंड बहुमताने विजय झाला आहे. सरकार तर स्थापन करणार, मात्र आता मुख्यमंत्री कोण होणार यावर चर्चा सुरू आहे. तसेच राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे नेते व मावळत्या विधानसभेचे उपाध्यक्ष नरहरी झिरवाळ यांनी अजित पवार मुख्यमंत्री व्हावेत अशी इच्छा व्यक्त केली आहे.

नरहरी झिरवाळ एका वृत्तवाहिनीला मुलाखत देताना म्हणाले, माझी, महाराष्ट्रातल्या युवकांची, लाडक्या बहिणींची इच्छा आहे की अजित पवार मुख्यमंत्री व्हावेत. ही जनतेची इच्छा आहे. दिलेला शब्द कधीच परत न घेणारा माणूस अशी अजित पवारांची ख्याती आहे. कामाचा माणूस म्हणून त्यांची ख्याती आहे. पण महायुतीचे नेते मिळून याबाबत निर्णय घेतील. पंतप्रधान नरेंद्र मोदी, अमित शाह, नितीन गडकरी, राज्यातले देवेंद्र फडणवीस, चंद्रशेखर बावनकुळे, एकनाथ शिंदे, स्वत: अजित पवार हे सगळे मिळून जो निर्णय घेतील, तो सगळ्यांना मान्य करावा लागेल. पण आमची विनंती असेल की अजित पवारांना एकदा मुख्यमंत्री करावे.

पुढे बोलताना नरहरी झिरवाळ म्हणाले, आमचा स्ट्राईक रेट चांगला आहे. पण भाजपाचे संख्याबळ मोठे आहे. पण तरीही आमची विनंती आहे की अजित पवारांना मुख्यमंत्री करावे. बघू. अजित पवारांनी ११ वेळा अर्थखाते चालवले आहे. इतक्या वेळा उपमुख्यमंत्री राहिले. आता एकदा मुख्यमंत्री करून तर बघावे अशी आमची प्रामाणिक इच्छा आणि विनंती आहे, असेही झिरवाळ म्हणाले.

तसेच यावेळी बोलताना नरहरी झिरवाळ यांनी शरद पवारांचा पक्ष अजित पवारांच्या पक्षात विलीन होऊ शकतो, असे सूचक विधान देखील केले आहे. झिरवळ म्हणाले, शक्यता नाकारता येत नाही. राजकारणात काहीही होऊ शकते. शरद पवारांचा पक्ष अजित पवारांच्या पक्षात विलीनही होऊ शकतो. त्यात वावगे काहीही नाही. राजकारणात कोण कधी कोणाचा शत्रू, कधी मित्र या गोष्टी चालूच असतात, असे झिरवाळ म्हणाले.

नरहरी झिरवाळ यांनी मंत्रीपदाची देखील इच्छा व्यक्त केली आहे. झिरवाळ म्हणाले, मी जिल्हा परिषद, पंचायत समिती, विधानभवन असे सगळे केले आहे. आता माझी एकच इच्छा राहील की मला एखादे मंत्रीपद द्यावे. मी मंत्रालयात रोज जातो. पण स्वत:चे असे काही तिथे असावे यासाठी मी ही मागणी करतोय. मला कोणतेही खाते दिले तरी चालेल, पण मंत्री करावे अशी माझी विनंती आहे. मला ते मिळेल असा माझा विश्वास आहे. मी चौथ्यांदा आमदार म्हणून निवडून आलो आहे, असेही नरहरी झिरवाळ यांनी यावेळी सांगितले.

मराठी टायपिंगसाठी
डी.टी.पी.ऑपरेटर मुले पाहिजे
------: संपर्क :------
साहिल कॉम्प्युटर्स
विद्यापीठ गेटजवळ, मोन्जू हॉटेल, जयसिंगपुरा, छ.संभाजीनगर (औरंगाबाद)
मो. 8956362639 /8087880274

## देवेंद्र फडणवीस दिल्लीला रवाना



**मुंबई** : महाराष्ट्र मुख्यमंत्री कोण होणार याबाबत चर्चा सुरू आहेत. भाजपला बहुमत असल्याने मुख्यमंत्री पदासाठी देवेंद्र फडणवीसांचे नाव निश्चित झाल्याची माहिती सुत्रांकडून मिळाली होती. आता देवेंद्र फडणवीस दिल्लीला रवाना झाले आहेत. दिल्ली येथे एका खासगी कार्यक्रमात सहभागी होणार आहेत. त्यानंतर अमित शहा यांच्यासोबत बैठक होणार आहे. रात्री साडे १० वाजता ही बैठक होणार असून या बैठकीत मुख्यमंत्री पदाबाबत काही निर्णय होण्याची शक्यता आहे.

सरकार स्थापनेसाठी महायुतीकडून हालचाली करण्यात येत आहेत. दिल्लीत मुख्यमंत्री पदाबाबत चर्चा होणार आहे. देवेंद्र फडणवीस आज सायंकाळी दिल्ली रवाना झाले असून रात्री साडे १० वाजता त्यांची अमित शहांसोबत बैठक होणार असल्याचे माहिती आहे. फडणवीसांपाठोपाठ अजित पवार आणि एकनाथ शिंदे हे देखील दिल्लीला जाऊ शकतात. देवेंद्र फडणवीस आणि अमित शहा यांच्या बैठकीत अजित पवार आणि एकनाथ शिंदे सहभागी होणार असल्याची चर्चा आहे. अमित शहा यांच्या निवासस्थानी ही बैठक होणार आहे. मुख्यमंत्री पदाबाबतचा फॉर्म्युला किंवा मुख्यमंत्री कोण हे ठरणार आहे. एकनाथ शिंदे यांना किती वर्षासाठी मुख्यमंत्री पद द्यायचे तसेच अजित पवारांना द्यायचे की नाही, याबाबतची अंतिम चर्चा या बैठकीत होणार आहे. तसेच या बैठकीत राज्य कॅबिनेट मंत्रिमंडळाचा देखील निर्णय होणार असल्याची माहिती आहे. याबाबत आज निर्णय झाल्यास उद्या नव्या सरकारचा शपथविधीचा कार्यक्रम पार पडण्याची शक्यता आहे

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार २६ नोव्हेंबर २०२४

# कितीदा पुन्हा.....!



कितीदा पुन्हा ते घडावे
मागचेच दिवस परतुनी यावे...

आशेनं जगत होते रे मी...
जातील हे दिवस कधी तरी...

केलास तू सर्व भ्रमनिरास
कितीदा पुन्हा तेच ते घडावे...

आशा या पल्लवित होत होत्या मनातल्या
त्या आशांना मालवलेस रे तू...

कितीदा पुन्हा ते घडावे...
जगण्यासाठी कितीदा हरावे..

मागचेच दिवस परतुनी यावेत..
तेव्हा मनाला दाह होतो फार...

कधीतरी वाटते नवीन दिवस यावे थोडेफार...
जगण्यापेक्षा मरण वाटते जास्त जवळचे...

कितीदा पुन्हा ते घडावे...
काही गोष्टीला असतो अंत..

कितीदा पुन्हा घडणे ते असते अनंत..
जगण्यासाठी असते परत-परत हरवत...!

डॉ योगिता मंगेश कथले (देवगिरीकर)
८९७५२९१९४०

# जागतिक वारसा सप्ताह निमित्त सिताऱ्हानी वास्तू ची स्वच्छता



**कन्नड (अरुण थोरात) :** जागतिक वारसा सप्ताह सह्याद्री प्रतिष्ठान चाळीसगाव विभागा च्या वतीने गौताळा अभयारण्यातील पुरातन सीताऱ्हाणी (पानपोई) वास्तूची साफसफाई करुण साजरा करण्यात आला.

दि. १९ नोव्हेंबर ते २५ नोव्हेंबर दरम्यान दरवर्षी देशभरात जागतिक वारसा सप्ताह साजरा केला जातो. यात पुराणतन वास्तु स्थळे, मंदिरे, गड किल्ले, लेण्या आदी पुरातन वारसांच्या बाबत त्यांचे जतन साफसफाई व ऐतिहासिक महत्त्व याबाबत जनजागृतीपर उपक्रम राबवले जातात.

याचाच एक भाग म्हणून सह्याद्री प्रतिष्ठान चाळीसगाव च्या वतीने दि. २४ नोव्हेंबर रोजी कन्नड तालुक्यातील गौताळा अभयारण्यात असलेल्या पुरातन सीताऱ्हाणी (पाणपोई) या वास्तूची साफसफाई करण्यात आली. या संपूर्ण वास्तू वर वाढलेले मोठमोठाले गवत वेली काटेरी झुडपे काढून तिला मोकळे करण्यात आले, गवत आणि काटेरी झुडपांमध्ये लुप्त होत असलेल्या या वास्तूस यामुळे मोकळा श्वास मिळाला आहे.

या पुरातन वास्तूला पानपोई असे देखील म्हटले जात, हेमाडपंथी मंदिरा सारख्या आकारात उभ्या असलेल्या या वास्तूमध्ये दोन मोठ मोठी पाण्याची रांजणे असून त्यात येणाऱ्या जाणाऱ्या वाटसरूंना पिण्यासाठी पाणी उपलब्ध होत होते. सायगव्हाण, भिलदरी जवळ असलेल्या खानदेशातून मराठवाड्यात जाण्यासाठीच्या पुरातन व्यापारी मार्गावर ही वास्तू असल्याने या पाण्याचा उपयोग त्यावेळी मोठ्या प्रमाणात होत असावा.

आज या वास्तूची संपूर्णपणे साफसफाई करून सह्याद्री प्रतिष्ठानने पुन्हा एकदा या वास्तूस नवसंजीवनी देण्याचा प्रयत्न केला आहे. या उपक्रमात सह्याद्री प्रतिष्ठानचे केंद्रीय उपाध्यक्ष दिलीप घोरपडे, जिल्हा प्रशासक गजानन मोरे, जिल्हा उपाध्यक्ष सचिन पाटील, संजय साठे, गणेश पाटील, जितेंद्र वाघ, बाळासाहेब सोनवणे, नाना चौधरी, भाऊसाहेब पाटील, जितेंद्र वरखेडे, संजय पवार, पैलवान सचिन पाटील, संभाजी पाटील, ललित चौधरी, शेखर आगोणे, ललित अण्णा चौधरी, गोरख वाघ, उमेश खेडकर, आदी सहभागी झाले होते.

# सर्वांगीण विकासासाठी गुणवत्तापूर्ण शिक्षण आवश्यक : हेरंब कुलकर्णी



**कन्नड (अरुण थोरात):** विकासाच्या दृष्टीने महाराष्ट्राची फाळणी झाली आहे. मुंबई, पुणे, नासिक हा भाग विकसित तर मराठवाडा व विदर्भाकडील भाग खूप मागे पडला आहे. कोणतही समाज विकसित करायचा असेल तर आठ, दहा बाबीं पैकी शिक्षण ही बाब महत्वाची आहे. पश्चिम महाराष्ट्रात कर्मवीर भाऊराव पाटील, शाहू महाराज यांसह अनेक समाजसुधारकां मुळे तो भाग विकसित झाला.

मराठवाडा व विदर्भात गुणवत्ता पूर्ण शिक्षण नसल्याने हा भाग मागे पडला आहे. ९ वि च्या मुलाला साधी बेरीज येत नाही, बारावीच्या मुलाला अर्ज लिहिता येत नाही, अशी परिस्थिती आहे. त्यामुळे मराठवाड्याच्या सर्वांगीण विकासासाठी गुणवत्तापूर्ण शिक्षण महत्वाचे असल्याचे प्रतिपादन प्रसिद्ध लेखक, कवी, शिक्षणतज्ञ हेरंब कुलकर्णी यांनी केले आहे.

ते दि. २५ नोव्हेंबर रोजी कन्नड शहरातील सहकार महर्षी बाळासाहेब पवार सार्वजनिक वाचनालयात, बाळासाहेब पवार यांच्या २५ व्या पुण्यतिथी निमित्त "शिक्षकांसाठी साने गुरुजी" या विषयावर आयोजित व्याख्यानात ते बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महात्मा फुले शिक्षण संस्थेचे अध्यक्ष उत्तमराव राठोड होते, तर जिजामाता शिक्षण संस्थेचे सचिव सागर जाधव, प्राचार्य डॉ. विजय भोसले, वाचनालायचे सचिव रामकृष्ण पवार यांची प्रमुख उपस्थिती होती.

श्री. कुलकर्णी पुढे म्हणाले की, साने गुरुजींनी आपल्या ५१ वर्षांच्या आयुष्यात ११५ पुस्तके लिहिली, प्रचंड मोठे काम केले, ते पुरुषाच्या रूपात विद्यार्थ्यांच्या आई होते. साने गुरुजींचा निःस्वार्थपणा, त्यांचे प्रेम,त्यांचे झोकून देऊन काम करण्याची वृत्ती महाराष्ट्राला हवे आहे.

शिक्षकांनी मुलांना विचार कसा करावा हे शिकवावे, मुलांना विचारी बनवणे हे शिक्षण व्यवस्थेचे काम आहे. शिक्षकांनी नियमित दररोज शिक्षण विषयावरील पुस्तकाचे किमान १५ पाने वाचावी.

आपली पत्नी, मुले असे आत्मकेंद्री न होता कोणत्याही एका सामाजिक चळवळीत गुंतवून घ्यावे. शिक्षकांनी ऊस तोड कामगार, दगड फोडणारे कामगार, विटभट्टी कामगार यांच्या मुलांच्या शिक्षणासाठी काम करावे अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

प्रास्ताविकात डॉ. भोसले म्हणाले की, स्व. बाळासाहेब पवार हे संघर्षातून तयार झालेले नेतृत्व होते, त्यांच्या कार्यकाळात त्यांनी अनेक ग्रामीण शिक्षित तरुणांना सहज नोकऱ्या दिल्या. ते खासदार, आमदार राहिले, मार्केटिंग फेडरेशन, जिल्हा सहकारी बँक, मराठवाडा शिक्षण संस्था, जिल्हा मार्केट कमेटी सह अनेक संस्थावार ते प्रमुख होते.

या सर्व संस्थेवर त्यांनी ग्रामीण तरुणांना नोकऱ्या देऊन स्थिर समाधानी जीवन दिले. यावेळी डॉ.शिवाजी हुसे, डॉ. कारभारी भानुसे, डॉ.यशवंत पवार, उपप्राचार्य डॉ.भाऊसाहेब मगर, हुकूमचंद पवार, नरेश सोनवणे, ऋषिकेश शिवदे, रवींद्र भागवत यांच्या सह प्राध्यापक, शिक्षक उपस्थित होते. सूत्रसंचलन प्रवीण दाभाडे यांनी केले तर आभार मुख्याध्यापक संजय जाधव यांनी मानले.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार २६ नोव्हेंबर २०२४


## संभाजीनगरमध्ये कुणाला मिळणार मंत्रीपद?

**छत्रपती संभाजीनगर :** विधानसभा निवडणुकीत मराठवाड्याची राजधानी समजल्या जाणाऱ्या छत्रपती संभाजीनगरमध्ये महायुतीला जबरदस्त यश मिळाले. जिल्ह्यात विधानसभेचे ९ मतदारसंघ आहेत. पण त्यापैकी एकाही जागेवर महाविकास आघाडीला यश मिळाले नाही. त्यामुळे आता येथील कोणत्या आमदारांच्या गळ्यात मंत्रीपदाची माळ पडणार? हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत अतुल सावे हे औरंगाबाद पूर्व, प्रदीप जैस्वाल हे औरंगाबाद मध्य, संजय शिरसाट हे औरंगाबाद पश्चिम, अब्दुल सत्तार हे सिल्लोड, प्रशांत बंब हे गंगापूर, रमेश बोरनारे हे वैजापूर, विलास भुमरे हे पैठण, अनुराधा चव्हाण या फुलंब्री व संजना जाधव यांनी कन्नड विधानसभा मतदारसंघातून विजय मिळवला. यापैकी सावे व सत्तार हे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मंत्रिमंडळात मंत्री होते. त्यामुळे आता त्यांना पुन्हा नव्या मंत्रिमंडळात संधी मिळणार का? विशेषतः आमदार संजय शिरसाट यांचीही मंत्रीपदाची इच्छा पूर्ण होणार का? अशी चर्चा जिल्ह्याच्या राजकीय वर्तुळात रंगली आहे.

अतुल सावे यांनी या निवडणुकीत विजयाची हॅट्ट्रिक केली. त्यांनी यंदा एमआयएमच्या इम्तियाज जलील यांना अस्मान दाखवून औरंगाबाद पूर्व मतदारसंघाचा आपला गड राखला. त्यांनी यापूर्वी राज्यमंत्री म्हणून उद्योग व खनिकर्म, अल्पसंख्यांक विकास वक्फ विभागाचे काम पाहिले आहे. ते गृहनिर्माण, इतर मागास बहुजन कल्याण मंत्रीही होते. जातीय समीकरणात ते सर्वात पुढे आहेत. विशेषतः उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे विश्वासू असल्यामुळे त्यांना मंत्रीपदाची संधी मिळण्याची दाट शक्यता आहे.

आमदार अब्दुल सत्तार हे मंत्रिपदाच्या शर्यतीत सर्वात पुढे आहेत. सध्या त्यांच्याकडे छत्रपती संभाजीनगरचे पालकमंत्रीपद आहे. मागील ४० वर्षांपासून ते राजकारणातील आपले अस्तित्व टिकवून आहेत. १९८४ मध्ये त्यांनी गामपंचायत निवडणुकीपासून आपल्या राजकारणाची सुरुवात केली. १९९४-९५ मध्ये त्यांनी तालुक्याच्या राजकारणात प्रवेश केला. ते सिल्लोडचे नगराध्यक्ष झाले. त्यानंतर १९९९ साली त्यांनी अपक्ष म्हणून विधानसभेत जाण्याचा अपयशी प्रयत्न केला. पण त्यानंतर २००१ मध्ये विधानसभेवर जाण्यात यशस्वी झाले.

## जेईएस महाविद्यालय येथे कायम सुरक्षा रक्षक भरतीला प्रचंड प्रतिसाद..



**जालना :** सूक्ष्म लघु मंत्रालय भारत सरकारच्या उपक्रमांतर्गत आणि भारत सरकारच्या पसारा ऍक्ट २००५ च्या नियमाप्रमाणे स्थानिक तरुणांसाठी कायमस्वरूपी नोकरीसाठी आयएसओ मान्यताप्राप्त शिवस्वराज्य सेक्युरिटी अँड मॅन पॉवर सर्विसेस प्रा.लि. आणि जे. ई. एस. महाविद्यालय जालना यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक २५ नोव्हेंबर २०२४ ते ३० नोव्हेंबर २०२४ पर्यंत सुरक्षा रक्षक भरतीचे आयोजन करण्यात आले आहे.

या भरतीस बेरोजगार युवकांचा चांगला प्रतिसाद मिळाला असून यामध्ये दि. २५ नोव्हेंबर २०२४ रोजी परिसरातील ज्या युवकांची नोकरीसाठी निवड झाली. त्यांना जागेवरच नियुक्तीपत्र देण्यात आले.

ही भरती प्रक्रिया दि. २५ नोव्हेंबर २०२४ ते ३० नोव्हेंबर २०२४ पर्यंत सकाळी ८ ते दुपारी १ पर्यंत जे. ई. एस. महाविद्यालय जालना येथे सुरू राहणार आहे. जालना जिल्ह्यातील सुशिक्षित बेरोजगार युवकांनी या भरतीचा मोठ्या प्रमाणात लाभ घ्यावा असे आवाहन, जेईएस महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.गणेश अग्निहोत्री, प्लेसमेंट अधिकारी तथा एनसीसी कमांडर प्रा. फुलचंद मोहिते, राष्ट्रीय सेवा योजनेचे जिल्हा समन्वयक डॉ.राजेंद्र सोनावणे तसेच भरती अधिकारी महेश सरतापे आणि संदीप राठोड यांनी केले आहे.. अधिक माहिती करिता भ्रमणध्वनी क्रमांक : ९५५२२३८०५७ शी संपर्क साधावा.

असे आव्हान जेईएस महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अग्निहोत्री यांनी केले आहे.

## राज्यात महायुतीची कोणतीही लाट नव्हती : मग हे सरकार जनतेने निवडून दिले आहे का? विजय वडेट्टीवार



**मुंबई :** २०१४ मध्ये मोदींची जशी लाट होती, तशी आता सरकारची कुठलीही लाट नव्हती. जनतेमध्ये सरकारविरोधात आक्रोश होता. त्यामुळे हे सरकार जनतेने निवडून दिले आहे का? असा सवाल काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी केला आहे. नाना पटोले यांच्याबाबत मला पूर्ण माहिती नाही. त्यांनी हायकमांड समोर काय भूमिका पाडली याची माहिती घेतो, असेही वडेट्टीवार यांनी सांगितले. तसेच आम्ही विरोधक म्हणून आमची भूमिका पार पाडू, असेही ते म्हणाले.

विजय वडेट्टीवार यांनी माध्यमांशी संवाद साधताना देवेंद्र फडणवीस यांना मुख्यमंत्रीपदासाठी शुभेच्छा दिल्या. महाराष्ट्रापुढे असलेल्या अनेक प्रश्नांना घेऊन लढणे हे आमचे कर्तव्य आहे. आम्ही विरोधक म्हणून आमची भूमिका पार पाडू, असेही विजय वडेट्टीवार म्हणाले. हे सरकार जनतेने निवडून दिले आहे का? असा प्रश्न महाराष्ट्रातील जनता टाहो फोडून विचारत आहे. त्याचे उत्तरही देणे अपेक्षित आहे, अशी टीका विजय वडेट्टीवार यांनी केली.

२०१४ मध्ये मोदींची लाट होती. त्यावेळी काँग्रेसने ४२ जागा जिंकल्या होत्या. २०१९ मध्ये पुलवामा सारख्या घटना घडल्या होत्या. तेव्हा काँग्रेस दोन आकडी संख्येही गाठू शकणार नाही, असे वातावरण होते. तशा वातावरणातही आम्ही ४४ जागांवर विजय मिळवला होता. पण आता आम्ही १६ जिंकल्या. सध्या राज्यात कुठलीही लाट नव्हती. सरकारविरोधात आक्रोश होता. जनमत हे सरकारच्या विरोधात असतानाही असा निकाल कसा लागू शकतो, असा प्रश्न लोकांनाच पडला आहे. याचे विश्लेषण आम्ही करू, असे वडेट्टीवार म्हणाले.

लाडकी बहीणच्या नावाने पाच टक्के मते फिरली असतील. पण लाडकी बहीण पुढे करून दुसरा खेला, प्रयोग झाला का? अशी चर्चा लोकांमध्ये आहे. तसेच महाराष्ट्रात असे शक्य नाही, असे जनता म्हणत असल्याचे विजय वडेट्टीवार म्हणाले.

शरद पवारांच्या पक्षाचे निवडून आलेले १० आमदार अजित पवार गटाच्या संपर्कात असल्याची चर्चा आहे. यावर बोलताना विजय वडेट्टीवार यांनी आता मोदी आणि शहा जे म्हणतील तेच होईल. राजा बोले और दल हले, याप्रमाणे राजे जे करतील ते होईल. मोदी आणि शहा यांना विरोधक ठेवायचा नाही. त्या भूमिकेतून सर्व सुरू आहे, अशी टीका केली.




महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार २६ नोव्हेंबर २०२४

# आमदारांकडून शपथपत्र लिहून घेणार : उद्धव ठाकरे



**मुंबई :** उद्धव ठाकरे आपल्या २० नव्या आमदारांकडून शपथपत्र लिहून घेणार असल्याचे समजते. एकनाथ शिंदेंनी बंड केले. पक्ष फोडला. ४० आमदार सोबत घेऊन भाजपच्या वळचणीला गेले. हा संभाव्य धोका पुन्हा होऊ नये यासाठी उद्धव ठाकरे आत्ताच दक्ष झाल्याचे समजते.

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या नवनिर्वाचित आमदारांची आज उद्धव ठाकरेंसोबत मातोश्रीवर बैठक पार पडली. या बैठकीत उद्धव ठाकरे यांनी नवनियुक्त आमदारांना मार्गदर्शन केले. विधानसभेत जरी समोर फडणवीस असले, तरी तुम्ही २० आहात. त्यांना पुरून उरा, असा कानमंत्र उद्धव ठाकरे यांनी आमदारांना दिला. या बैठकीत पक्षाचा प्रतोद, गटनेते आणि सभागृह नेते यांची निवड करण्यात आली.

विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडीला दारुण पराभवाचा सामना करावा लागला. महाविकास आघाडीतील शिवसेना ठाकरे गटाचे सर्वाधिक २० आमदार निवडून आले आहेत. या नवनिर्वाचित २० आमदारांची उद्धव ठाकरे यांनी आज बैठक घेतली. यावेळी उद्धव ठाकरे यांनी आमदारांचे मनोधैर्य वाढवण्याचा प्रयत्न केला. शिवसेना स्थापनेच्या काळात वामनराव माहडिक हे शिवसेनेचे एकमेव आमदार विधानसभेत होते. त्यावेळी त्यांनी एकटे असूनही विधानसभा गाजवली होती. पण तुम्ही आता २० आहात, त्यामुळे आपल्या मुद्द्यांनी आणि भूमिकेने विधानसभा गाजवा, असे उद्धव ठाकरे आमदारांना म्हणाले.

दरम्यान, शिंदे गटाचे आमदार भरत गोगावले यांनी ठाकरे गटातील काही आमदार आपल्या संपर्कात असल्याचा दावा केला. या सर्व पार्श्वभूमीवर तसेच पक्षफुटीचा मोठा अनुभव घेतल्यानंतर ठाकरे गटाकडून विशेष खबरदारी घेतली जात असल्याचे पाहायला मिळत आहे. उद्धव ठाकरे विजयी आमदारांकडून शपथपत्र लिहून घेतल्याची माहिती आहे. दगाफटका होऊ नये तसेच पक्षफुटीचा धोका लक्षात घेता शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाकडून नवनिर्वाचित आमदारांकडून हे शपथपत्र लिहून घेतले. पक्षामध्ये पक्षप्रमुखांचा निर्णय हा अंतिम राहणार, पक्षाने घेतलेल्या निर्णयाशी सर्व आमदार बांधिल असतील, अशा आशयाचे हे शपथपत्र सर्व नवनिर्वाचित आमदारांकडून लिहून घेतल्याची माहिती आहे.

या बैठकीत पक्षाचा प्रतोद, गटनेते आणि सभागृह नेते निवडण्यात आले. उद्धव ठाकरे यांनी भास्कर जाधव यांच्यावर मोठी जबाबदारी दिली आहे. भास्कर जाधव यांची उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या गटनेते पदी निवड करण्यात आली आहे. सुनिल प्रभू यांची पुन्हा एकदा प्रतोदपदी नियुक्ती करण्यात आली आहे. तर आदित्य ठाकरे यांची विधिमंडळ पक्ष नेतेपदी निवड करण्यात आली. पक्षप्रमुखांनी दिलेला आदेश विनम्रपणे स्वीकारावा लागतो. अन्यथा आदित्य ठाकरे यांची विधानसभा गटनेते पदी निवड व्हावी, असे माझे मत होते, अशी प्रतिक्रिया भास्कर जाधव यांनी दिली.

# हवामान शास्त्रज्ञ डॉ. रामचंद्र साबळे यांचा सन्मान



**छत्रपती संभाजीनगर :** ज्येष्ठ हवामान शास्त्रज्ञ डॉ. रामचंद्र साबळे यांनी वयाच्या ७५ वर्षी सॅटलाईट मेटिरॉलॉजी, डॉपलर रडार या विषयाचा आंतरराष्ट्रीय दर्जाचा अभ्यासक्रम यशस्वीरित्य पूर्ण केला आहे. याबद्दल त्यांना प्रशिस्तीपत्र देऊन सन्मान करण्यात आला आहे. या अभ्याक्रमामुळे त्यांना हवामानाचा अचुक अंदज वर्तवण्यासाठी उपयोग होणार आहे.

साऊथ असिया मेटिरॉलॉजीकल असोसिएशन (सामा) व ॲडव्हॉन्स सेंटर फॉर ॲटमॉस्पेरिक रिसर्च कोचीन, सायन्स ॲण्ड टेक्नॉलॉजीकल युनिव्हर्सिटी यांच्या संयुक्त विद्यमाने २५ मे ते २३ नोव्हेंबर दरम्यान सॅटलाईट मेटिरॉलॉजी विषयाच्या अभ्यासक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्यात ४७ देशातील १९० शास्त्रज्ञांनी सहभाग घेतला. यामध्ये महाराष्ट्रातून डॉ. रामचंद्र साबळे यांचा समावेश होता. विशेष म्हणजे त्यांनी हा अभ्यासक्रम वयाच्या पंचाहत्तराव्या वर्षी पूर्ण केला आहे. यामुळे त्यांचे सर्वस्तरातून कौतुक होत आहे.

आंतरराष्ट्रीय दर्जावर झालेल्या डॉपलर रडार विषयावर एक्स्पर्ट हवामान तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले. या अभ्यासक्रमामुळे त्यांना हवामानातील अनपेक्षित बदल टिपणे व सुक्ष्म निरीक्षण करून अचुक अंदाज वर्तवण्यासाठी फायदेशीर ठरणार असल्याची माहिती डॉ. साबळे यांनी दिली.

२०२५ वर्षापर्यंत डॉपलर रडार बसवले जाणार

देशात ३७ ठिकाणीच डॉपलर रडार तंत्रज्ञान बसवलेले आहेत. त्यात २०२५ पर्यंत मोठ्या प्रमाणात वाढ करण्यात येणार आहे. यामध्ये छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याचा देखील समावेश आहे. डॉपलर रडार कार्यान्वित झाले तर पाऊस, थंडी, तापमान, वादळ, विजा, आदींचा अगोदर अचुक अंदाज वर्तवणे शक्य होईल.

